

# संतभूमी संरक्षक संघर्ष समिती-महाराष्ट्र राज्य.



संस्थापक-अध्यक्ष-श्री हरिभक्त मधुसूदन महाराज, भामचंद्र डोंगर, पो.वासुली, ता.खेड (राजगुरुनगर), जि.पुणे

**नम्र आवाहन...!!**

**वारकरी संप्रदायासह महाराष्ट्रातील तमाम जनता जनार्दनासाठी**

श्रीक्षेत्र भामचंद्र डोंगर
साक्षात्कार भूमीतून....

प्रिय स्वजन हो,

*** नम्र सूचना ***

संतभूमी अबाधित ठेवण्यासाठी संतभूमी संरक्षक संघर्ष समितीने महाराष्ट्रव्यापी आंदोलन छेडले आहे. या आंदोलन-अभियान दौऱ्यासाठी खालीलप्रमाणे एखाद्या सेवेची जबाबदारी भाविकांना घेता येते. त्यास्तव इच्छुक दानशूरांनी प्रत्यक्ष भेटून किंवा श्री. गजानन महाराज (मो.९८५०४२९८०९), श्री मधुसूदन महाराज (मो.९४२७३८४०५०) यांचेशी फोनवर त्वरीत संपर्क साधावा.

*** सेवा म्हणून आपण हे करु शकता ***

१) संतभूमीच्या सेवेचे कर्तव्य म्हणून महाराष्ट्रांतर्गत आपला संपूर्ण जिल्हा किंवा विभागवार (उदा.- मराठवाडा, विदर्भ, खानदेश, कोकण इ.) दौऱ्याच्या बैठकीसाठी आपण आपली स्वत:ची गाडी (रथ म्हणून) ड्रायव्हर व एक सहकाऱ्यासह देवून सेवेची जबाबदारी स्विकारु शकता **किंवा** अशी व्यवस्था एखादी सेवाभावी संस्था/मंडळही करु शकते. (गाडीवर सौजन्यदर्शक तशी पाटी लावता येईल)

२) श्रीक्षेत्र भंडारा व भामचंद्र डोंगराच्या उत्खणन दशेचे V.D.O. चित्रण CD रुपात संतभूमी संरक्षक संघर्ष समितीकडे आहे. आपल्या वाढदिवसानिमित्त किंवा आपले आई-वडील वा पुण्यपुरुषाच्या स्मरणार्थ त्या CD च्या हजारो प्रति काढून (CD वर तसे लेबल व फोटो लावून) या अभियान दौऱ्यात प्रचार-प्रसारासाठी त्या प्रती संतभूमी सेवाकार्य म्हणून आपण समितीकडे देऊ शकता.

३) तुकोबांच्या भंडारा भामचंद्र डोंगरांची वस्तुस्थितीदर्शक माहिती महाराष्ट्रभर सर्वांना कळावी म्हणून त्या प्रबोधनासाठी आपण आपल्या (सौजन्य) नावाने हजारो/लाखो पत्रके छापून संतभूमी संरक्षक संघर्ष समितीकडे देवून किंवा आपण स्वत: आमच्या बरोबर राहून संत सेवेचे हे कार्य साधू शकता.

४) जगत्गुरु संत तुकोबांची ध्यान-चिंतन तपोभूमी भंडारा-भामचंद्र डोंगर रक्षणार्थ संतभूमी संरक्षक संघर्ष समिती संपूर्ण राज्यभर फकिरीवृत्तीने फिरणार असून योगक्षेमासाठी ज्यांना अंत:करणपूर्वक सेवा द्यावी वाटते त्यांनी "फुल ना फुलाची पाकळी" या रुपात नि:संकोचपणे द्यावी. आम्ही ती आनंदाने स्विकारु.

५) संतभूमी संरक्षक संघर्ष समितीचे आजिवन सभासदत्त्व स्विकारुन संतभूमीच्या संरक्षण कार्यासाठी समर्पण वृत्तीने तन-मन-धन सेवेद्वारा आपले जीवन कृतार्थ करु शकता.

६) संतभूमी संरक्षक संघर्ष समितीचे पाईक (कार्यकर्ते) या नात्याने आपल्याला प्रस्तुत या पत्रकाच्या हजारो झेरॉक्स/छापून प्रति आपल्या नावे किंवा मंडळाच्या नावे प्रकाशित करुन वाटता येतील किंवा ज्ञानोबा-तुकोबांच्या ऋणातून उत्तीर्ण होण्यासाठी आपण जिथे जसे असाल तिथे चर्चा-संवाद, व्याख्यान, किर्तन-प्रवचन रुपाने या पत्रकातील माहिती प्रकाशित करावी ही आमची नम्र अभिलाषा.

आपली,
**संतभूमी संरक्षक संघर्ष समिती**

*आळंदीतील विभागीय कार्यालयाशी पत्रव्यवहाराचा पत्ता :*
*विभागीय कार्यलिय - संतभूमी संरक्षक संघर्ष समिती*
कार्याध्यक्ष- श्री. गजानन महाराज पिंपळे, श्री. सूर्यभानजी पिंपळे स्मृतीभवन
अलंकापुरीनगर, आळंदी-देवाची, तालुका- खेड, जिल्हा पुणे, पिन - ४१२ १०५

संपर्क – ७०८३७०५१७८/९४२०२२४३४१